# MAHARASHTRA ACT No. XLVIII OF 1975

## THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS (POSTPONEMENT OF ELECTIONS DURING THE EMERGENCY ) ACT, 1975

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १६ सप्टेंबर १९७५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम्. ए. धोत्रे,
सहसचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XLVIII OF 1975

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO CERTAIN VILLAGE PANCHAYATS DURING THE PERIOD OF THE EMERGENCY DECLARED ON THE 25TH DAY OF JUNE 1975

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २० सप्टेंबर १९७५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८

**दिनांक २५ जून १९७५ रोजी जाहीर केलेल्या आणीबाणीच्या कालावधीत विवक्षित ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** ज्यांची मुदत संपली आहे अथवा संपत आली आहे अशा कित्येक ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका नजिकच्या भविष्यकाळात घेणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २५ जून १९७५ रोजी जाहीर केलेल्या आणीबाणीमुळे अशा निवडणुका घेण्यासाठी ज्यांची आवश्यकता आहे असे जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व त्यांचा कर्मचारीवर्ग यांना आणीबाणीच्या कालावधीत हाती घ्यावयाच्या इतर कार्यक्रमाकडे आपली सर्व. शक्ती लावणे आवश्यक आहे आणि परिणामी ते निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध होऊ शकणार नाहीत ; तसेच, अशा कालावधीत अशा अनेक निवडणुका घेणे हे सामान्य जनतेसही गैरसोयीचे होईल ;

**आणि ज्याअर्थी,** या कारणास्तव, ग्रामपंचायतींच्या उपरोक्त सार्वत्रिक निवडणुका तसेच, पोट-निवडणुका विवक्षित कालावधीसाठी लांबणीवर टाकणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** निवडणुका अशा रीतीने लांबणीवर टाकण्याच्या परिणामी, विवक्षित ग्राम-पंचायतींच्या सदस्यांचा व प्रशासकांचा पदावधी वाढविणे आणि उपरोक्त बाबींशी संबंधित अशा प्रयोजनांसाठी तरतूद करणे आवश्यक आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

ंक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायती (आणीबाणीच्या कालावधीत निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ असे म्हणता येईल.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

(३) दिनांक २५ जानेवारी १९७५ रोजी भारतीय संविधानाचा अनुच्छेद ३५२, खंड यान्वये काढलेली आणीबाणीची उद्घोषणा प्रवर्तनात असल्याच्या कालावधीत आणि त्या सहा महिनेपर्यंत किंवा राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल अगोदरच्या तारखेपर्यंत तो प्रवर्तनात राहील; आणि त्यानंतर तो समाप्त होईल. मुंबई सा परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, या अधिनियमाच्या समाप्तीनंतर, जणू महाराष्ट्र अधिनियमाद्वारे हा अधिनियम रद्द करण्यात आला असल्याप्रमाणे लागू होईल.

व्याख्या.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "प्रशासक" म्हणजे, पंचायत अधिनियमाचे कलम १६०, पोट-कलम (१) चा खंड (ब) अन्वये नेमण्यात आलेला प्रशासक आणि त्यात त्या अधिनियमाचे कलम १४५, पोट-कलम (२) चा खंड (ब) अथवा कलम १५१, पोट-कलम (१) चा खंड (अ) अन्वये नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होईल ;

(ब) "पंचायतीची निवडणूक" म्हणजे, पंचायतीच्या सदस्याची निवडणूक ; परंतु त्यांत, सरपंचाच्या अथवा उप-सरपंचाच्या निवडणुकीचा समावेश होणार नाही ;

(क) "पंचायत" या शब्दाला पंचायत अधिनियमात जो अर्थ नेमून दिला आहे तोच त्याचा अर्थ असेल ;

(ड) "आणीबाणी" म्हणजे दिनांक २५ जून १९७५ रोजी भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३५२, खंड (१) अन्वये काढलेल्या उद्घोषणेद्वारे जाहीर केलेली आणीबाणी ;

(ई) "पंचायत अधिनियम" म्हणजे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.

विवक्षित निवडणुका लांबणीवर टाकणे व सदस्यांचा पदावधी वाढविणे.

३. पंचायत अधिनियम किंवा तदन्वये करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा उप-विधी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, कोणत्याही पंचायतीची कोणतीही सार्वत्रिक निवडणूक आणि कोणत्याही पंचायतीतील कोणतीही तात्पुरती रिकामी झालेली जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस जे पदावर असतील अशा कोणत्याही पंचायतीच्या सदस्यांचा किंवा कोणत्याही पंचायतीच्या प्रशासकाचा किंवा प्रशासकांचा पदावधी (कोणताही वाढविण्यात आलेला पदावधी धरून) (मग त्यांचा पदावधी, उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा उक्त तारखेनंतर हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत कोणत्याही वेळी संपणारा असो), वाढविण्यात आल्याचे किंवा यथास्थिति वाढविण्यात यावयाचा असल्याचे मानण्यात येईल व असा प्रत्येक सदस्य किंवा प्रशासक, हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीत, पद धारण करण्याचे चालू ठेवील :

परंतु, सदस्य किंवा प्रशासक यांचा या कलमान्वये वाढविण्यात आलेला पदावधी समाप्त झाल्यानंतर, पुनर्रचना करण्यात आलेल्या पंचायतीच्या ज्या सभेत गणपूर्ती असेल अशा पहिल्या सभेपर्यंत, ते पदावर असण्याचे चालू राहील.

४. निकटपूर्ववर्ती कलमान्वये ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात येत असेल किंवा यथास्थिति वाढविण्यात आला असेल असे पंचायतीचे सर्व सदस्य व सर्व प्रशासक हे, वाढविण्यात आलेल्या संपूर्ण मुदतीतसुद्धा (या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असो वा प्रारंभानंतर) असे सदस्य किंवा यथास्थिती, प्रशासक म्हणून, सर्व शक्तीचा वापर करण्यास व सर्व कर्तव्ये व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व ते तसे सक्षम असतील व उक्त मुदतीत अशा कोणत्याही सदस्याने किंवा प्रशासकाने केलेले कोणतेही कृत्य हे, पदावधी वेळेवर वाढविण्यात आला नव्हता, किंवा अन्यथा तो यथोचितरीत्या वाढविण्यात आला नव्हता, किंवा पदावधी वाढविण्यात आल्याच्या मुदतीत, पंचायतीस, सदस्यास किंवा यथास्थिती प्रशासकास पंचायत, सदस्य किंवा प्रशासक यांच्या सर्व शक्तीचा वापर करता येत नव्हता व त्यांची सर्व कर्तव्ये व कामे पार पाडता येत नव्हती याच केवळ कारणावरून, विधिबाह्य असल्याचे समजण्यात येणार नाही किंवा कोणत्याही न्यायालयात त्याविरुद्ध आक्षेप घेता येणार नाही. ज्यांचा पंचायतीचे पदावधी वाढविण्यात आला असेल असे सदस्य इत्यादींच्या शक्ती व विवक्षित कृत्यांना विधिग्राह्यता देणे.

५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने शासकीय राजपत्रात अधिसूचित करावयाच्या तारखेपूर्वी (हा अधिनियम समाप्त होण्याच्या तारखेच्या पूर्वीची तारीख असलेली) संबंधित जिल्हाधिकारी व इतर अधिकारी यांच्याकडून, विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा, हा अधिनियम प्रवर्तनात असलेल्या कालावधीत वाढवण्यात आलेला पदावधी समाप्त होण्यापूर्वी, पंचायत अधिनियम आणि तदन्वये करण्यात आलेले नियम व उप-विधी यांच्या उपबंधानुसार नवीन पंचायतींची रचना करण्याची व्यवस्था करण्यात येईल. विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांचा वाढविलेला पदावधी समाप्त होण्यापूर्वी नवीन पंचायतींची रचना करावयाची व्यवस्था करणे.

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ती खेरीजकरून, पंचायत अधिनियम हा, संबंधित पंचायतीस इतर सर्व बाबतीत लागू असेल. सन १९५९चा मुंबई अधिनियम तीन लागू असणे.

७. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्भवेल तर, राज्य शासनास, प्रसंगानुसार आदेशाद्वारे, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक असल्याचे आढळून येईल अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करणे.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**

प्रभारी भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.